# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर शहरात महानगरपालिका क्षेत्रात G-२० परिषदेच्या
**{आकाशचिन्ह परवाना विभाग}** अनुषंगाने करावयाचे Branding and Hospetality च्या कामांकरीता प्राप्त झालेली मे. साईनपोष्ट इंडीया लि. यांची रु. ८,७८,००,०००/- च्या निविदा दराबाबत मा. आयुक्त यांचे कक्षात मे. साईनपोस्ट इंडीया ली. यांचे प्रतिनिधी यांचे सोबत वाटाघाटी अंती रु. ८,७८,००,०००/- व वस्तु व सेवा कर रू. १,५८,०४,०००/- असे एकुण रू. १०,३६,०४,०००/- ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

संक्षिप्त टिपणीः-

१. G-२० परिषद पुर्व तयारीच्या अनुषंगाने Branding and Hospetality च्या कामांकरीता एजेन्सी नियुक्त करण्याकरीता EOI वर्तमानपत्रात ई-निविदा क्र. ५८९/पी.आर, ०७.०२.२०२३ तथा शासनाचे सांकेकीत स्थळ, www.maharashtratenders.gov.in वर निविदा प्रकाशित करण्यात आली.

२. दिनांक १४.०२.२०२३ रोजी नियोजीत वेळेवर मा. आयुक्त महोदय तथा अति. आयुक्त (शहर) आणि उपायुक्त (महसुल) यांचे उपस्थीतीत सभा कक्षात EOI संदर्भात खालील इच्छुक एजेन्सीव्दारे सादरीकरण करण्यात आले.

   १. मे. साईनपोस्ट इंडीया ली.

   २. मे. कन्सेप्ट कम्युनिकेशन ली.

३. दिनांक १७.०२.२०२३ रोजी नियोजीत वेळेत दोन निविदाकारानी सहभाग घेतलेला. उक्त दोन्ही एजेन्सींनी EOI प्रपत्रातील अटी नुसार सादर केलेल्या दस्तऐजवाच्या आधारे Qualification Criteria आणि Evaluation Marking Chart मध्ये नमुद केल्यानुसार दोन्ही एजेन्सींनी तांत्रिक स्कोअरमध्ये ७०% गुण मिळवले असल्यामुळे पात्रतेनुसार आर्थिक बोलीत सहभाग घेण्याच्या पुढील प्रक्रियेसाठी आणि दयावयाचे Request for Proposal (RFP) देण्याकरीता मा. आयुक्त यांचे दिनांक २३.०२.२०२३ रोजी मान्यता प्राप्त झाली.

४. दोन्हीही पात्र निविदाकारास आर्थिक बोलीत सहभाग घेण्याकरीता शासनाचे सांकेकीत स्थळ, www.maharashtratenders.gov.in वर Tender I.D. No. २०२३_NMCN८७७३९४_१ अन्वये Request For Proposa (RFP) व्दारे Commercial Bid प्रसिध्द करण्यात आले.

५. दोन्हीही एजेन्सींनी Request for Proposal (RFP) व्दारे Commercial Bid सादर केली.

६. Techinical Seore (Ts) व Financial Score (Fs) च्या आधारे गुणांक नोंदवून उच्चतम गुणांक प्राप्त होणा-या मे. साईनपोस्ट इंडीया ली. यांची रू. ८,८३,००,०००/- व वस्तु व सेवा कर रू. १,५८,९४,०००/- असे एकुण रू. १०,४१,९४,००/- ची न्युनतम निविदा पात्र ठरतो आहे.

७. दिनांक ०२.०३.२०२३ रोजी मा. आयुक्त यांचे कक्षात मे. साईनपोस्ट इंडीया ली. यांचे प्रतिनिधी यांचे सोबत वाटाघाटी करण्यात आले असता त्यांनी निविदा दर रू. ८,८३,००,०००/- ऐवजी रू. ८,७८,००,०००/- अधिक वस्तुसेवाकर या दरावर काम करण्याची तयारी दर्शविली.

८. सबब मे. साईनपोष्ट इंडीया लि. यांची रु. ८,७८,००,०००/- व वस्तु व सेवा कर रू. १,५८,०४,०००/- असे एकुण रू. १०,३६,०४,०००/- ची निविदा मंजूर करण्यास विभागाची शिफारस आहे.

सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 303/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 03/03/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), आकाशचिन्ह परवाना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत

केल्यानुसार  नागपूर शहरात महानगरपालिका क्षेत्रात G-२० परिषदेच्या अनुषंगाने करावयाचे Branding and Hospetality च्या कामांकरीता प्राप्त झालेली मे. साईनपोष्ट इंडीया लि. यांची रु. ८,७८,००,०००/- च्या निविदा दराबाबत मा. आयुक्त यांचे कक्षात मे. साईनपोस्ट इंडीया ली. यांचे प्रतिनिधी यांचे सोबत वाटाघाटी अंती रु. ८,७८,००,०००/- व वस्तु व सेवा कर रू. १,५८,०४,०००/- असे एकुण रू. १०,३६,०४,०००/- ची निविदा मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**